N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): नवी मुंबई **P.S.**(ठाणे): ए पी एम सी **Year** (वर्ष): 2021

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0288 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 10/08/2021 14:56 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): शुक्रवार

**Time Period** (कालावधी): पहर 5

**Date From** (दिनांक पासून): 30/07/2021

**Date To** ( दिनांक पर्यंत): 30/07/2021

**Time From** (वेळेपासून): 13:27 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 14:05 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 10/08/2021 **Time** (वेळ): 11:37 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 019 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 10/08/2021 13:37 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): एपीएमसी पोलीस स्टेशन, चे गेटलगत फुटपाथवर,नवी मुंबई

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): योगेश शामजी भानुशाली

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1993 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अशोक काटे चाळ,रुम नं3,सुभाष रोड,साईबाबा ,मंदिरा जवळ, डोंबीवली,जिठाणे,ए पी एम सी , नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अशोक काटे चाळ,रुम नं3,सुभाष रोड,साईबाबा ,मंदिरा जवळ, डोंबीवली,जिठाणे,ए पी एम सी , नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):** पत्रकार

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पंकज प्रकाश महाजन | | | 1. सध्या नियंत्रण कक्ष नवीमुंबई,ए पी एम सी ,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |
| 2 | पोना2911 सुनिल अंकुश पवार | | | 1. नेमणुक मुख्यालय नवीमुंबई,ए पी एम सी ,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी, श्री योगेश शामजी भानुशाली, वय.28 वर्षे, धंदा-व्यवसाय, रा. अशोक काटे चाळ, रुम नं.3,सुभाष रोड,साईबाबा मंदिरा जवळ, डोंबीवली, जि.ठाणे समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की मी मुंबई जगत, राष्ट्रीय हिन्दी समाचार चा प्रेस रिपोर्टर म्हणुन काम करीत असुन त्यावर माझा व माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. मी मुंबई जगत, राष्ट्रीय हिन्दी समाचार चा प्रेस रिपोर्टर असल्याने माझे एपीएमसी पोलीस स्टेशन, नवीमं ुबई येथे कामानिमीत्त येणे जाणे असते ं. एपीएमसी पोलीस स्टेशन, नविमं ुबई येथे गुन्हा रजि. नं. 248/2021 भा.द.वि.कलम 408 प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यात माझे ओळखीचे दोन मित्रांना अटक करण्यात आली असुन त्यांना जामीन करण्यासाठी मी पोलीस उपनिरीक्षक महाजन यांना भेटण्यास गेलो होतो. त्यावेळी सदरच्या गुन्ह्यात माझा मित्र विपुल तुळशीदास भानुशाली, राह. डोबिवली याचा सहभाग असल्याचे पोलीस उपनिरीक्षक महाजन यांनी मला सांगुन विपुल यास गुन्हयात अटक न करण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक महाजन यांनी मला मध्यस्ती करण्यास सांगितले. मला विपुल भानुशाली याचेकडुन दिड लाख रुपये साहेबांसाठी व 3 लाख रुपये स्वतःसाठी असे 4,50,000/-रूपये आणुन देण्यास सांगितले. 4,50,000/-रूपये आणुन न दिल्यास विपुल भानुशाली यास वरील गुन्हया व्यतिरीक्त आणखी इतर गुन्हयात अटक करण्याची धमकी दिली. तसेच मलाही तु मध्यस्ती केली नाहीस तर तुला पण विपुलचा साथीदार म्हणुन सदर गुन्हयात अटक करीन अशी भीती घातली. मी सदरचीबाब माझा मित्र विपुल भानुशाली यास सांगितली. त्यामुळे पोलीस त्याला घरी पकडण्यास येतील म्हणुन घाबरून विपुल भानुशाली हा त्याचे डोबिवली येथील रहाते घरी न थांबता सुबोदया लाज नेरूळ, नवीमुंबई येथे रहावयास गेला. पोलीस उप निरीक्षक महाजन यांनी विपुल याचे लोकेशन काढुन दिनांक 25/07/2021 रोजी रात्री त्यास सदर लाजवरून पकडुन वाशी येथील एका लाजवर आणले ं. त्यावेळी पोलीस उप निरीक्षक महाजन यांनी मला मध्यस्ती करण्यास बोलावुन घेवुन माझेकडे विपुल यास सोडण्यासाठी पुन्हा 4,50,000/- रूपयाची मागणी केली. त्यावेळी पोलीस उप निरीक्षक महाजन हे विपुल यांस वरील गुन्हया व्यतिरीक्त इतर खे ाटया गुन्हयातही अटक करतील म्हणुन आंम्ही घाबरून विपुल याचे रहाते घराची कागदपत्र गहाण ठेवनु 1 लाख 40 हजार रूपये पोलीस उप निरीक्षक महाजन यांना दिले. त्यावेळी पोलीस उप निरीक्षक महाजन यांनी हे 1लाख 40 हजार साहेबांसाठी आहेत उर्वरीत 3,50,000/-रूपये कधी देणार अशी मला विचारणा केली त्यावेळी 3,50,000/-रूपये मी, 30 तारखेला देतो असे सांगितले. त्यानंतरही पोलीस उप निरीक्षक महाजन यांनी पुन्हा माझेकडे, विपुल यास अटक न करण्यासाठी 3,50,000/- रूपयाची मागणी करून सदरची रक्कम लवकर देण्याचा तगादा लावला. मला व माझा मित्र विपुल भानुषाली याला पोलीस उप निरीक्षक महाजन यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी, माझा मित्र विपुल भानुशाली यांचेवतीने

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

13. Action (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.) Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): SHIVAJI GANPAT KATHE
**Rank** (पद): SI (Sub-Inspector)
**No.**(क्र.): PSMH27635 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): VIKAS RAMRAO RAMUGADE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PNMAH50804

पोलीस ठाणे अपलदार
पी एन सी पोलीस ठाणे
मुंबई

फिर्याद दिनांक. १०/०८/२०२१

मी, श्री योगेश शामजी भानुशाली, वय.२८ वर्षे, धंदा–व्यवसाय, रा. अशोक काटे चाळ, रुम नं. ३,सुभाष रोड,साईबाबा मंदिरा जवळ, डोंबीवली,जि.ठाणे समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की,

मी, वरीलप्रमाणे असुन नमुद पत्यावर माझे कुटुंबासह राहण्यास आहे. मी ''मुंबई जगत, राष्ट्रीय हिन्दी समाचार'' चा प्रेस रिपोर्टर म्हणुन काम करीत असुन त्यावर माझा व माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.

मी ''मुंबई जगत, राष्ट्रीय हिन्दी समाचार'' चा प्रेस रिपोर्टर असल्याने माझे एपीएमसी पोलीस स्टेशन, नवीमुंबई येथे कामानिमीत्त येणे जाणे असते. एपीएमसी पोलीस स्टेशन, नविमुंबई येथे गुन्हा रजि. नं. २४८/२०२१ भा.द.वि.कलम ४०८ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयात माझे ओळखीचे दोन मित्रांना अटक करण्यात आली असुन त्यांना जामीन करण्यासाठी मी पोलीस उपनिरीक्षक महाजन यांना भेटण्यास गेलो होतो. त्यावेळी सदरच्या गुन्हयात माझा मित्र विपुल तुळशीदास भानुशाली, राह. डोबिवली याचा सहभाग असल्याचे पोलीस उपनिरीक्षक महाजन यांनी मला सांगुन विपुल यास गुन्हयात अटक न करण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक महाजन यांनी मला मध्यस्ती करण्यास सांगितले. मला विपुल भानुशाली याचेकडुन दिड लाख रुपये साहेबांसाठी व ३ लाख रुपये स्वत:साठी असे ४,५०,०००/–रूपये आणुन देण्यास सांगितले. ४,५०,०००/–रूपये आणुन न दिल्यास विपुल भानुशाली यास वरील गुन्हया व्यतिरीक्त आणखी इतर गुन्हयात अटक करण्याची धमकी दिली. तसेच मलाही ''तु मध्यस्ती केली नाहीस तर तुला पण विपुलचा साथीदार म्हणुन सदर गुन्हयात अटक करीन'' अशी भीती घातली.

मी सदरचीबाब माझा मित्र विपुल भानुशाली यास सांगितली. त्यामुळे पोलीस त्याला घरी पकडण्यास येतील म्हणुन घाबरून विपुल भानुशाली हा त्याचे डोंबिवली येथील रहाते घरी न थांबता सुबोदया लॉज नेरुळ, नवीमुंबई येथे रहावयास गेला. पोलीस उप निरीक्षक महाजन यांनी विपुल याचे लोकेशन काढुन दिनांक २५/०७/२०२१ रोजी रात्री त्यास सदर लॉजवरून पकडुन वाशी येथील एका लॉजवर आणले. त्यावेळी पोलीस उप निरीक्षक महाजन यांनी मला मध्यस्ती करण्यास बोलावुन घेवुन माझेकडे विपुल यास सोडण्यासाठी पुन्हा ४,५०,०००/–रूपयाची मागणी केली. त्यावेळी पोलीस उप निरीक्षक महाजन हे विपुल यांस वरील गुन्हया व्यतिरिक्त इतर खोटया गुन्हयातही अटक करतील म्हणुन आंम्ही घाबरून विपुल याचे रहाते घराची कागदपत्र गहाण ठेवनु १ लाख ४० हजार रूपये पोलीस उप निरीक्षक महाजन यांना दिले. त्यावेळी पोलीस उप निरीक्षक महाजन यांनी हे १लाख ४० हजार साहेबांसाठी आहेत उर्वरीत ३,५०,०००/–रूपये कधी देणार अशी मला विचारणा केली त्यावेळी ३,५०,०००/–रूपये मी, ३० तारखेला देतो असे सांगितले. त्यानंतरही पोलीस उप निरीक्षक महाजन यांनी पुन्हा माझेकडे, विपुल यास अटक न करण्यासाठी ३,५०,०००/– रूपयाची मागणी करून सदरची रक्कम लवकर देण्याचा तगादा लावला. मला व माझा मित्र विपुल भानुशाली याला पोलीस उप निरीक्षक महाजन यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी, माझा मित्र विपुल भानुशाली याचेवतीने पोलीस उप निरीक्षक महाजन यांचे विरूध्द कायदेशीर कारवाई होणेसाठी दिनांक २९/०७/२०२१ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो ठाणे अंतर्गत राबोडी कार्यालय येथे येवुन पोलीस निरीक्षक श्री सुरेश चोपडे यांना भेटुन त्यांचेकडे तक्रारी अर्ज दिला आहे.

मी लाचेच्या मागणीबाबत दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने पुढील कारवाई करण्यासाठी पोलीस निरीक्षक श्री.सुरेश चोपडे यांनी तात्काळ मा. सहायक आयुक्त,कळवा प्रभाग समिती, ठाणे महानगरपालीका, ठाणे. यांना दिनांक २९/०७/२०२१ रोजी दोन पंच साक्षीदार मिळणेबाबत पत्र दिले. पत्राचे अनुषंगाने संबधीत कार्यालयाकडुन दोन पंच साक्षीदार नामे १) श्री.अमोल विजय यादव,वय.४६वर्षे,लिपीक, पाणीपुरवठा विभाग, कळवा प्रभाग समिती, ठा.म.पा.ठाणे. २) श्री. विजय प्रकाश साळवे, वय:–३२ वर्षे,शिपाई पाणी पुरवठा विभाग, कळवा प्रभाग समिती, ठा.म.पा.ठाणे, असे ॲन्टी करप्शन ब्युरो,ठाणे अंतर्गत राबोडी कार्यालयात हजर झाले.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लोकसेवक महाजन हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत लोकसेवक यांचेकडे पडताळणी करणे आवश्यक असल्याने पोलीस निरीक्षक/सुरेश चोपडे यांनी मला,लोकसेवक यांनी भेटण्याकरीता कधी बोलावले आहे असे विचारले. त्यावेळी मी, लोकसेवक महाजन यांनी

Yogesh

दिनांक ३०/०७/२०२१ रोजी एपीएमसी पोलीस ठाण्यात भेटण्यास बोलावले असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक/सुरेश चोपडे यांनी मला व दोन्ही पंचाशी चर्चा करून दिनांक ३०/०७/२०२१ रोजी एपीएमसी पोलीस स्टेशन, नवीमुंबई येथे जावुन पडताळणी करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे दोन्ही पंचांना व पडताळणी पथकातील अमलदार यांना दिनांक ३०/०७/२०२१ रोजी सकाळी १०:३० वा. पावेतो अेसीबी, ठाणे अंतर्गत राबोडी कार्यालयात हजर रहाण्याबाबत सुचना देवुन सदर प्रकरणाबाबत गोपनियता बाळगण्यास सांगितले. तसेच मला कोपरखैरणे रेल्वे स्टेशन समोर, नवीमुंबई येथे येवुन भेटण्यास सांगितले.

दिनांक ३०/०७/२०२१ रोजी सकाळी १२.१० वा.चे दरम्यान मी ठरल्याप्रमाणे कोपरखैरणे रेल्वे स्टेशनचे आवारात निर्जन ठिकाणी येवुन थांबलो. त्यानंतर पोलीस निरीक्षक/सुरेश चोपडे हे व्हॅगनर कार क्र. MH 46/AL-8683 या खाजगी वाहनाने दोन्ही पंच तसेच पडताळणी पथकातील अंमलदार सपोउपनि/प्रकाश विचारे व सपोउपनि/सोंडकर यांचेसह पडताळणी व सापळा कारवाई करीता आवश्यक ती साधन सामुग्री घेवुन सदर ठिकाणी१२.१५ वा आले

मी, दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ३०/०७/२०२१ रोजी सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करून लागलीच करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान माझे शर्टचे आतील बनियनमध्ये डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन मला, पंच श्री. अमोल यादव यांचे समवेत लोकसेवक महाजन यांना भेटण्यास एपीएमसी पोलीस स्टेशन, नवीमुंबई येथे पाठविण्यात आले. मी व पंच नं. १ श्री. अमोल यादव असे एपीएमसी पोलीस स्टेशन येथे गेल्यावर मी लोकसेवक महाजन यांना फोन करून ''महाजन सर ऑफीस के बाहर खडा हुं '' असे म्हणालो. त्यांनतर लोकसेवक हे थोडयावेळाने पोलीस ठाण्याचे बाहेर आले. तेव्हा मी लोकसेवक महाजन यांना भेटुन माझा मित्र विपुलचे कामासंबधी केलेल्या चर्चे दरम्यान लोकसेवक महाजन मला **'' आज का दिन टाईम है...''** असे म्हणाले. तेंव्हा मी लोकसेवक यांना **''नही... नही...मै मेरे बहन के पास जा रहा हु.... मै एक लाख लेके आता हु.....सॉरी एक ही लाख थोडी बोला है....बोला सर थोडी एक ही लाख बोले थे.... दो लाख मांगे थे..''** असे म्हणालो. त्यावेळी मी विपुल भानुशाली यास फोन केला असता **'' साहाब को मैने एक चालीस दे दिया हुं..... तीन चार बजे के पेहले एक पेटी हो जायेगा ''** असे विपुल म्हणाला. त्यावर लोकसेवक **'' मैने उसके मोबाईल का लोकेशन निकाला ''**असे म्हणाले. तेव्हा मी **'' मुझे नही लगता है वो (विपुल)गया था...''**असे म्हणालो. त्यावेळी लोकसेवक मला **'' ये क्या है...(तक्रारदार यांना मोबाईलवर लोकेशन दाखवत...)''** असे म्हणाले. तेंव्हा मी लोकसेवक यांना म्हणालो **'' किसने.. आव्हाड...''** तेव्हा लोकसेवक मला **''सचिन आव्हाड ने बताया मुझे''** असे म्हणाले. तेव्हा मी **'' वन.... डेढ लाख .... खत्म कर देता हुं....''**.असे म्हणालो. त्यावर लोकसेवक म्हणाले **'' हां... हां.... घेना न देना.... तेरा गाडी भी लेके जा... जो ये खत्म कर दे...''** असे म्हणाले. तेव्हा मी **'' सर हाथ पे .........साडेतीन –चार बोल रहा है... अपना कितना बोल रहे है.... दो... तीन .... (तक्रारदार यांचे हातावर लिहीताना)... ''** असे म्हणालो. त्यावर लोकसेवक **''ठिक है.... साडेतीन दे.... दे...''**.असे मला म्हणाले. तेव्हा मी **''हां.... किधर..''** असे म्हणालो. त्यावर लोकसेवक **''आज भेज... ''**असे मला म्हणाले.

परंतु त्यानंतर लोकसेवक पो.उप निरीक्षक महाजन यांना माझेबाबत संशय आल्याने त्यांनी पोलीस सुनिल पवार यांना हाताने मला मीठी मारण्याचा इशारा केला असता पवार यांनी मला मिठी मारली. त्यावेळी पवार यांचे हाताला माझे शर्टचे आत बनियनमध्ये लावलेले व्हॉईस रेर्कार्डर लागल्याने पोलीस मला पकडतील म्हणुन मी पवार यांचे हात झटकुन **''सर ....ट्रॅप हो रहा है....ट्रॅप चालु है.... पिछे खडे है...''** असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक म्हणाले**'' काय झाल..''** तेव्हा मी लोकसेवक यांना**'' मै अलग जा रहा हुं... जाओ सर....... पिछे खडे है..... आप चले जाओ........ट्रॅपवाले पिछे खडे है..''**..असे म्हणालो. त्यावेळी पोलीस सुनिल पवार हे मला **''मशिन लगाया है क्या तुने,'' तुने मशीन लगाया है क्या? फेक दे''** असे म्हणाले. त्यानंतर मी धावत पेट्रोल पंपाचे दिशेने जाताना लोकसेवक पो.उप निरीक्षक महाजन यांनी आणखी ३ पोलीसांना सोबत घेवुन माझा पाठलाग करून त्यांनी मला पेट्राल पंपावर पकडले. त्यावेळी लोकसेवक मला म्हणाले **'' ट्रॅप लागुन गेला आता.....सही बोलना...''**.त्यावेळी मी **''मै वॉन्टेड हो रहा हुँ.....मुझे कॉल मत करना.....सामनेसे कॉल मत करो...... समझमे आ रहा है...पवार सर के हाथ में मशिन दिया.''**असे लोकसेवक यांना सांगितले असता ते घाबरलेल्या नजरेने इकडे तिकडे पाहुन नंतर तेथुन पळत सुटले. त्यावेळी मी घाईघाईत एका रिक्षात बसलो.

१०५८४

**रिक्षामध्ये बसल्यावर मी पोनि/सुरेश चोपडे यांना मोबाईल फोनवर संपर्क करून " सर बबाल हो गया...उन्होने मेरा तलाशी वलाशी लिया है....सर उनको पता चल गया."** असे सांगितले. त्यानंतर मी रिक्षाने पथक थांबलेल्या कोपरखैरने रेल्वे स्टेशनचे आवारात परत आलो. माझे पाठोपाठ पंच श्री अमोल यादव हे सुध्दा दुसरे रिक्षाने परत आले.

आम्ही परत आल्यानतर पोलीस निरीक्षक श्री सुरेश चोपडे यांनी मला व पंच नं.१ श्री अमोल यादव यांना सदरबाबत विचारणा केली असता आंम्ही वर नमुद प्रमाणे हकिकत सांगितली. त्यांनतर पोलीस निरीक्षक श्री सुरेश चोपडे यांनी स्वत: दोन्ही पंचासमक्ष, माझे व लोकसेवक यांचेत डिजीटल व्हाईस रेकॉर्डरद्वारे मेमरी कार्डावर ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता ते मी सांगितलेल्या हकीकतीशी मिळते जुळते असल्याबाबत पंचाची व पोलीस निरीक्षक श्री सुरेश चोपडे यांची खात्री झाली.

सदर संभाषणातून व मी आणि पंचांनी सांगितलेल्या हकिकतीनुसार यातील लोकसेवक महाजन यांनी, माझे मित्र विपुल तुळशीदास भानुशाली यांस, एपीएमसी पो.स्टे.गुन्हा रजि. नं. २४८/२०२१ भा. द. वि. कलम ४०८ प्रमाणे दाखल गुन्हयात आरोपी न करण्यासाठी, माझेकडे **३,५०,०००/—रूपये(साडे तिन लाख रूपये)लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे तसेच यापुर्वी लोकसेवक महाजन यांनी एक लाख चाळीस हजार रूपये घेतल्याचे पडताळणी कारवाईत निष्पन्न झाले.**

एकंदरीत पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक महाजन यांनी माझेकडे **३,५०,०००/— रूपये (साडे तिन लाख रूपये)लाचेच्या रक्कमेची मागणी केल्यानंतर** त्यांना माझा संशय आल्याने लोकसेवक व त्यांचे सोबतचे पोलीसांनी मला पकडु नये म्हणुन मी **"सर ....ट्रॅप हो रहा है....ट्रॅप चालु है.... पिछे खडे है..." वगैरे बोलल्यामुळे** लोकसेवक यांना अॅन्टी करप्शन ब्युरोकडुन सापळा रचण्यात आल्याचे समजले आहे. त्यामुळे लोकसेवक महाजन आता, माझेकडुन मागणी केलेल्या लाचेचे रक्कमेचा स्विकार करतील असे वाटत नसल्याने पोलीस निरीक्षक श्री सुरेश चोपडे यांनी, सदरबाबत दोन्ही पंचांशी व माझेशी विचारविनीमय करून लाचेच्या मागणीच्या अनुषंगाने सापळा कारवाई होण्याची शक्यता राहीली नसल्याने सापळा कारवाई स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

अशा प्रकारे मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने, पोलीस निरीक्षक श्री सुरेश चोपडे व त्यांचे पथकाने दिनांक ३०/०७/२०२१ रोजी १३:२७ ते १४:०५ वा. चे दरम्यान एपीएमसी पोलीस स्टेशन, नवीमुंबई चे गेट लगत फुटपाथवर केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये, लोकसेवक पंकज प्रकाश महाजन, पोलीस उपनिरीक्षक, तत्कालीन नेम. एपीएमसी पोलीस स्टेशन, नवीमुंबई सध्या नियंत्रण कक्ष नवीमुंबई यांनी, त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा गैरवापर करून, स्वत:चे आर्थीक फायदयासाठी, माझा मित्र विपुल तुळशीदास भानुशाली यांस, एपीएमसी पो.स्टे.गुन्हा रजि. नं. २४८/२०२१ भा. द.वि.कलम ४०८ प्रमाणे दाखल गुन्हयात आरोपी न करण्यासाठी, तसेच मला मध्यस्थी न केल्यास विपुलचा साथीदार म्हणुन गुन्हयात अटक न करण्यासाठी माझेकडे **३,५०,०००/— रूपये (साडे तिन लाख रूपये)लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे तसेच यापुर्वी लोकसेवक पो.उप निरीक्षक महाजन यांनी एक लाख चाळीस हजार रूपये घेतल्याचे निष्पन्न झाले आहे.**

तसेच नमुद पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक पो.उप निरीक्षक महाजन यांनी लाचेची मागणी केल्यानंतर त्यांना संशय आल्याने लोकसेवक यांनी हाताने केलेल्या इशा—यावरून पोलीस अंमलदार सुनिल पवार यांनी मला चेक करण्याचे उद्देशाने "अरे गले मिलं, गले मिल"असे म्हणुन मिठी मारली त्यावेळी त्याचे हाताला माझे बनियानचे आतील बाजुस लावलेले व्हाईस रेकॉर्डर लागले. तेव्हा पवार यांनी तक्रारदार मला **"मशिन लगाया है क्या तुने," तुने मशीन लगाया है क्या? फेक दे"** असे म्हणुन **लोकसेवक पो.उप निरीक्षक महाजन यांना सदर अपराध करण्यास मदत करून प्रोत्साहन दिले आहे.**

म्हणुन माझी लोकसेवक पंकज प्रकाश महाजन, पोलीस उपनिरीक्षक, तत्कालीन नेम. एपीएमसी पोलीस स्टेशन, नवीमुंबई सध्या नियंत्रण कक्ष नवीमुंबई व निलंबीत पोना/२९११ सुनिल अंकुश पवार नेमणुक मुख्यालय नवीमुंबई यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ व १२ प्रमाणे फिर्याद आहे.

हे लिहुन दिले.

समक्ष

**(सुरेश गणपत चोपडे)**
**पोलीस निरीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे**